नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १७/०३/२०२६ (मंगळवार )

# नागपुर ग्रामीण जिल्हयात अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द ७ गुन्हे नोंद
# ७ वाहनांसह ७७ ब्रास रेती असा ३ कोटी ४८ लाख ९५ हजारांचा मुद्देमाल जप्त
# उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग, पोलीस स्टेशन रामटेक आणि स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक** :– दिनांक १७/०३/२०२६ रोजी उपविभागिय पोलीस अधिकारी,रामटेक उपविभाग, पोलीस स्टेशन रामटेक आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे नमुद पोलीस पथकांनी रेती तस्कारांवर कारवाई केली. उपविभागिय पोलीस अधिकारी – २ कारवाई, पोलीस स्टेशन रामटेक – ०१ कारवाई आणि स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण – ४ कारवाई अशा एकुण ७ कारवाई करून ७ गुन्हे नोंद करण्यात आले.

**उपविभागिय पोलीस अधिकारी,रामटेक यांची कामगिरी** :– श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग यांनी त्यांच्या पथकासह तुमसर ते रामटेक राखी तलावाजवळ नाकाबंदी आणि पेट्रोलींग केली असता वाहन क्रं १) ट्रक क्र एम एच ३६ ए बी ०९४४ हे वाहन मिळुन आले. नमुद वाहनाचा **चालक नामे किशोर निलकंठ सुर्यवंशी, वय ३५ वर्षे, रा शिवणी भोंडकी ता रामटेक ,जि नागपुर** हा अवैधरित्या १२ ब्रास रेती वाहतुक करीतांना मिळुन आला. वाहन मालक आरोपी **क्रं २. आशिष पटले, रा. डोंगरला,तुमसर जि भंडारा** याच्या सांगण्यावरून पाटील टोला घाट, ता तिरोडा, जि. गोंदीया येथुन अवैधरित्या रेती आणल्याची माहीती प्राप्त झाली. वाहन क्रं २) टिप्पर क्र एम एच ४०

सीटी ९२६८ हे वाहन मिळुन आले. नमुद वाहनाचा **चालक नामे ईश्वर पुडलिंक गोटेफोडे वय ३२ वर्षे, रा बोरी, ता तुमसर जि भंडारा** हा अवैधरित्या १५ ब्रास रेती वाहतुक करीतांना मिळुन आला. वाहन मालक **आरोपी क्रं २ नेहाल खोब्रागडे,तुमसर जि भंडारा** याच्या सांगण्यावरून पाटील टोला घाट, ता तिरोडा, जि. गोंदीया येथुन अवैधरित्या रेती आणल्याची माहीती प्राप्त झाली. नमुद आरोपीतांना रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्यांच्याकडे कोणताही परवाना नव्हता. **पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद २ वाहने किमती १,१०,००,००० /—रूपये आणि एकुण २७ ब्रास रेती किंमती १,३५,०००/— रूपये असा एकुण १,११,३५,००० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी :—** स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण च्या पथकाने तुमसर ते रामटेक रोडवरील, नगरधन फाटा, राखी तलावाजवळ तसेच शितलवाडी परीसरात नाकाबंदी करून तसेच पेट्रोलींग करून वाहने तपासली असता वाहन क्रं १) टाटा कंपनीचा १२ चक्का टिप्पर क्र एम एच ४० सीटी ८४६२ हे वाहन मिळुन आले.नमुद वाहनाचा **चालक नामे लखन सुखराम पारधी, वय ३६ वर्षे रा शिहरी, ता मोहाडी, जि भंडारा** हा अवैधरित्या १० ब्रास रेती वाहतुक करीत असतांना मिळुन आला. वाहन क्रं २) टाटा कंपनीचा १२ चक्का टिप्पर क्र एम एच ४९ बि.झेड. ७२४९ हे वाहन मिळुन आले. नमुद वाहनाचा **चालक नामे चंद्रकुमार आनंदराव पुंडे, वय ४० वर्षे, रा नवेगाव, ता मोहाडी,जि भंडारा** हा अवैधरित्या १० ब्रास रेती वाहतुक करीतांना मिळुन आला. वाहन क्रं ३) टाटा हायवा क्र एम एच ४० सी वाय १८१९ हे वाहन मिळुन आले. नमुद वाहनाचा **चालक नामे कैलास गजानन ढोरे, वय २७ वर्षे, रा सराखा बोर्डा, ता रामटेक , जि नागपुर** हा अवैधरित्या १० ब्रास रेती वाहतुक करीतांना मिळुन आला.तसेच वाहन क्रं ४) टाटा हायवा क्र एम एच ४० सीटी १८१९ हे वाहन मिळुन आले. नमुद वाहनाचा **चालक नामे आकाश नारायण राउत, वय २८ वर्षे, रा हरदोली,ता. ,तुमसर,जि भंडारा** हा अवैधरित्या १० ब्रास रेती वाहतुक करीतांना मिळुन आला. नमुद आरोपीतांना रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्यांच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. तसेच सदर रेती ही पाटील टोला घाट, ता तिरोडा, जि. गोंदीया येथुन अवैधरित्या आणल्याची माहीती प्राप्त झाली. **पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद ४ वाहने किमती**

**२,००,००,००० /—रूपये आणि एकुण ४० ब्रास रेती किंमती २,००,०००/— रूपये असा एकुण २,०२,००,००० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**पोलीस स्टेशन रामटेक यांची कामगिरी :—** रामटेक पोलीसांनी तुमसर ते रामटेक मार्गावर पेट्रोलींग केली राखी तलावाजवळ अशोक लेलॅंड कंपनीचा १२ चक्का टिप्पर क्र एम एच ४० सीटी ९६३५ हे वाहन मिळुन आले. नमुद वाहनाचा **चालक आरोपी क्रं १. राकेश रमाकांत मेश्राम, वय ३२ वर्षे रा सालई खु.,ता. मोहाडी, जि भंडारा** हा अवैधरित्या १० ब्रास रेती वाहतुक करीत असतांना मिळुन आला. वाहन मालक आरोपी क्रं **२. मनोज नागोराव शेंडे, परसवाडा, तुमसर जि भंडारा** याच्या सांगण्यावरून लोबी घाट गोंदीया येथुन अवैधरित्या रेती आणल्याची माहीती प्राप्त झाली. आरोपीला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्यांच्याकडे कोणताही परवाना नव्हता. **पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद वाहन किमती ३५,००,००० /—रूपये आणि एकुण १० ब्रास रेती असा एकुण किंमती ३५,६०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**सदर कारवाई ७७ ब्रास रेती सह ७ वाहने असा ३,४८,९५,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद वाहन चालक आणि मालक यांच्या विरूध्द पोस्टे रामटेक येथे कलम ३०३(२), ४९ भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम , सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम, सह कलम मोवाका अन्वये ७ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.**




TATA
TATA


BABA
AHUJA

# ६ महीन्यांपासुन मिळुन येत नसलेला एमपीडीए प्रकरणातील आरोपी अटक, रामटेक पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन रामटेकः— पोलीस स्टेशन रामटेक हद्दीतील सराईत आरोपी नामे **महेश भैय्याजी बरगट, वय ४२ वर्ष, रा. सुभाष वार्ड, आंबेडकर चौक, रामटेक जि. नागपुर** याचे वर अवैध जुगाराचे अनेक गुन्हे नोंद आहे. नमुद आरोपीने परिसरात अवैध जुगार अड्डे सुरू केले होते. नमुद आरोपी हा असे गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे. त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे असामाजिक प्रवृत्तीला चालना मिळत होती तसेच नागरिकांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले होते. पोलीसांनी त्याचेविरूध्द वेळोवेळी कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली. परंतु आरोपी **महेश भैय्याजी बरगट** याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली होती.

**मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली रामटेक पोलीसांकडुन एमपीडीए कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. मा. जिल्हाधिकारी ,नागपुर यांनी सराईत गुन्हेगार महेश भैय्याजी बरगट, वय ४२ वर्ष, रा. सुभाष वार्ड, आंबेडकर चौक, रामटेक जि. नागपुर याचे विरूध्द दिनांक १९/०९/२०२५ रोजी स्थानबध्दतेता आदेश काढला होता. तेव्हा पासुन नमुद आरोपी हा मिळुन येत नव्हता. रामटेक पोलीसांनी सातत्याने शोध घेवुन गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे दिनांक १६/०३/२०२६ रोजी त्याला ताब्यात घेतले. नमुद आरोपीला अटक करून कारागृह नागपुर येथे दाखल केले आहे.**



**सराईत गुन्हेगार महेश भैय्याजी बरगट**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. कन्हान पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक १६/०३/२०२६ रोजी कन्हान पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा कन्हान पिपरी येथे कन्हान नदीच्या काठावर काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी घटनास्थळी धाड टाकली असता आरोपी नामे १) मयूर सागर शेंडे, वय २४ वर्ष, रा.सत्रापुर कन्हान, २) अमन रामु पात्रे, वय ३३ वर्ष, रा, विष्णु लक्ष्मीनगर, कन्हान ३) शुभम नामदेव रंगारी, वय २४ वर्ष, रा. न्यु माररकेट ,पिपरी कन्हान, ४) विरेन्द्र रविन्द्र पात्रे, वय २४ वर्षे, रा. सत्रापुर, कन्हान ता. पारशिवनी,**हे ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आले.**

**आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ ताशपत्ते रोख आणि रक्कम १९०० /— रूपये असा एकुण १९५०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन कन्हान येथे १२(अ) म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## सट्टापट्टी लिहणाऱ्या आरोपींविरूद्ध ३ गुन्हे नोंद भिवापुर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापुर :—** दिनांक १६/०३/२०२६ रोजी भिवापुर पोलीस अवैध धंदयावर कारवाई कामी हद्दीत पेट्रोलींग करीत असता त्यांना अवैध जुगाराबाबत गोपनीय माहिती मिळाली .मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी खालील प्रमाणे कारवाई करून अवैध रित्या सट्टापट्टी लिहणाऱ्या आरोपीविरूध्द ३ गुन्हे नोंद केले.

१. जुना बसस्टॉप मज्जीद चौक नांद येथे **टिकाराम जर्नाधन मुरकुटे, वय ६० वर्षे, रा . महालगाव, ता. उमरेड, जि.नागपुर** हा सट्टीपट्टी चालवित आसतांना मिळुन आला. २. सुनिल सावजी भोजनालय च्या बाजुला भिवापुर येथे आरोपी नामे **सुनिल गोविंदराव बुचे, वय ४२ वर्ष, रा भिवापुर ता भिवापुर** हा सट्टीपट्टी चालवित आसतांना मिळुन आला, ३. रेल्वे स्टेशन परीसर, भिवापुर **नारायण उर्फ बच्चन वासुदेव तरारे, वय ५० वर्ष, रा. इंदीरा वार्ड, भिवापुर ता. भिवापुर** हा सट्टीपट्टी चालवित आसतांना मिळुन आल्याचे त्यांचेवर कारवाई करून प्रत्येक १ गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

नमुद कारवाईत सट्टापट्टीचे साहीत्य आणि नगदी १,४१५/— रुपये असा मुद्देमाल जप्त करून नमुद आरोपीविरूद्ध पोलीस स्टेशन भिवापुर येथे कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये ३ गुन्हे नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या विनापरवाना देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, भिवापुर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापुर** :— दिनांक १६/०३/२०२६ रोजी भिवापुर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, **अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक केली** जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ खापरी सायगाव रोड येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान मो.सा. क्र. एम एच ३१ ए झेड ५९७७ मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता देशी दारू मिळुन आली. आरोपी **सुनिल रामचंद्र मेश्राम, वय ४४ वर्ष, रा धरमपेठ नांद, ता. भिवापूर, जि नागपूर** हा अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष १) २४

१८० मिलीच्या देशी दारू बॉटल्स् आणि २) मो.सा. क्र. एम एच ३१ ए झेड ५९७७ असा एकुण १६६५०/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

**नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन भिवापुर येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १० गुन्हे नोंद

दिनांक १६/०३/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू काढणारे, दारू बाळगुन विक्री, वाहतुक तसेच सेवन करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू आणि वाहन असा एकुण **१९,३२०/—** रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १० गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी नामे अतुल ज्ञानेश्वर मानवटकर वय ४१ रा. चापेगडी ता. कुही याचे वर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे महिला आरोपी हिचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन भिवापुर** येथे आरोपी नामे सुनिल रामचंद्र मेश्राम वय ४४ वर्ष रा धरमपेठ नांद  ता. भिवापूर जिल्हा नागपूर याचे वर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी नामे किरण श्रावण चोपडे, वय ५२ वर्ष,  रा मासोद याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे अशोक लक्ष्मण ससाणकर, वय ६२ वर्ष, रा कोथूळणा, ता. सावनेर जि. नागपूर याचे वर एक गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे आरोपी १) मस्या उर्फे  महेश बंडु पवार वय २६ वर्ष रा वार्ड १७ वडार मोहल्ला सावनेर, २) बाबु मारोती पवाार वय ३२ वर्ष रा  वार्ड १७ वडार मोहल्ला,सावनेर आणि महीला आरोपी याचे वर प्रत्येकी १ एक गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे बिरमलाल अमरसिंग तवर, वय ४० वर्ष, रा.भवानी पुरा ता.ईकलेरा जि. बालाघाट ह.मु. लाखोडी ता.काटोल जि.नागपुर याचे वर एक गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पारशिवणी**  येथे आरोपी नामे तोताराम देवराम एकनाथ, वय ३८ वर्षे, रा.सरोदी टोला पारशिवनी, ता.पारशिवनी याचे वर एक गुन्हा नोंद, अशा आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १० गुन्हे दाखल केले आहे.

**नमुद कारवाईत एकुण १) २४ लिटर मोहाफुल गावठी दारू २) ४३२० मिली देशी दारू असा आणि दारू वाहतुकीसाठी वापरलेली मोटर सायकल असा एकुण १९,३२०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७५९ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १७/०३/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २२ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. एकुण ७५९ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३२ आरोपी अशा एकुण ९५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४० आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३३ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २४ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २९ आरोपी अशा एकुण १२६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३१ आरोपी अशा एकुण १२४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २३ आरोपी आणि पोलीस स्टेशन वडोदा येथे १० आरोपी अशा एकुण ६६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ५२ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३५ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २६ आरोपी अशा एकुण १४१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ८७ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ५६ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३३ आरोपी अशा एकुण २०७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २२ पोलीस स्टेशन येथे एकुण ७५९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने